सकाळ posiview
पुणे, सोमवार, १२ डिसेंबर २०११ : ६

Smart करबचत

# इन्फ्रास्ट्रक्चर बाँड
# करपूर्व व करपश्चात परतावा



राहुल मंत्री
posiview.response@esakal.com

करबचतीचा मोसम आता पुन्हा एकदा सुरू झाला आहे. इन्फ्रास्ट्रक्चर बाँड्समध्ये गुंतवणूक करण्याचा पर्याय यंदा सर्वाधिक चर्चेत आहे. या बाँड्समध्ये गुंतवणूक करताना कोणत्या प्रकारचे गुंतवणूक धोरण अवलंबिण्यात यावे, याबाबत संमिश्र प्रवाह सुरू आहे. बँकेच्या मुदत ठेवींमध्ये ९.५ टक्के ते १०.५ टक्क्यांपर्यंत व्याज मिळत असल्याने अनेकांना असे वाटते, की ९ टक्के या करपात्र दराने पाच वर्षांसाठी या बाँड्समध्ये गुंतवणूक अडकवून ठेवू नये. वरकरणी पाहता बँकेच्या मुदतठेवी हा अधिक चांगला पर्याय वाटू शकतो; परंतु सखोल अभ्यास केल्यास असे लक्षात येते, की आज बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या बहुसंख्य निश्चित उत्पन्नाच्या पर्यायांच्या तुलनेत इन्फ्रास्ट्रक्चर बाँड्स निश्चितच अधिक चांगला आयआरआर (परतावा) मिळवून देणारे असतात. करबचतीच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास ९ टक्के व्याजदराच्या इन्फ्रा बाँड्समधील गुंतवणूक पाच वर्षांपर्यंत तशीच कायम ठेवली तर १८.७६ टक्के इतका उच्च परतावा मिळू शकतो. सोबतच्या तक्त्यामध्ये विविध करश्रेणींनुसार पाच आणि दहा वर्षे कालावधीसाठी इन्फ्रा बाँड्सच्या परताव्याची (आयआरआर) तुलनात्मक मांडणी दाखविली आहे.

(खालील चौकट पाहावी)

चौकटीतील विश्लेषणावरून असे लक्षात येईल, की ९ टक्क्यांपेक्षा अधिक परतावा देणारा पर्याय उपलब्ध झाल्यास गुंतवणूकदारांनी पाच वर्षांनंतर इन्फ्रास्ट्रक्चर बाँड्समधील गुंतवणुकीतून बाहेर पडावे; तसेच जर फेरखरेदीच्या पर्यायाद्वारे गुंतवणूकदार पाच वर्षांनंतर बाहेर पडल्यास बाजारात सध्या उपलब्ध असलेल्या बहुसंख्य ट्रिपल ए मानांकनाच्या निश्चित उत्पन्न देणाऱ्या पर्यायांच्या तुलनेत त्याला या योजनेतून अधिक चांगला परतावा मिळू शकतो.

**(लेखक सर्टिफाईड फायनान्शिअल प्लॅनर-सीएफपी असून, मिडास टच, पुणे या कंपनीचे प्रमुख सल्लागार आहेत.)**

| | पाच वर्षांसाठी ९ टक्के इन्फ्रा बाँड्सचा आयआरआर | | | दहा वर्षांसाठी ९ टक्के इन्फ्रा बाँड्सचा आयआरआर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तपशील | Tax @ ३०% | Tax @ २०% | Tax @ १०% | Tax @ ३०% | Tax @ २०% | Tax @ १०% |
| गुंतविलेली रक्कम | २०,००० | २०,००० | २०,००० | २०,००० | २०,००० | २०,००० |
| कर बचत | ६००० | ४००० | २००० | ६००० | ४००० | २००० |
| कर वजा जाता बाँड्सची किंमत | १४,००० | १६,००० | १८,००० | १४,००० | १६,००० | १८,००० |
| वार्षिक व्याज | १८०० | १८०० | १८०० | १८०० | १८०० | १८०० |
| कर वजा जाता मिळणारे व्याज | १२६० | १४४० | १६२० | १२६० | १४४० | १६२० |
| **करपूर्व आयआरआर** | १८.७६% | १४.९६% | ११.७६% | १४.९७% | १२.६% | १०.७% |
| **करपश्चात आयआरआर** | १५.३२% | १२.८७% | १०.७९% | ११.५०% | १०.५% | ९.७% |

**नोंद : आकडेमोडीच्या सुलभतेसाठी करावरील अधिभार वगळण्यात आला आहे.**

L&T Infra
Tax Saving Bonds
2011B SERIES

IDFC